## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

### प्रकटन

विषय :- फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ साठी सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र (**Hall Ticket**) उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी)परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर शुक्रवार दिनांक १०/०१/२०२५ रोजी **Admit Card** या **link** व्दारे **download** करण्याकरिता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

ऑनलाईन प्रवेशपत्रे (**Hall Ticket**) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

१. फेब्रुवारी-मार्च २०२५ साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी इ.१२ वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

२. प्रवेशपत्र (**Hall Ticket**) ऑनलाईन (**Online**) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापक/प्राचार्य यांचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.

३. ज्या आवेदनपत्रांना "**Paid**" असे **Status** प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे "**Paid Status Admit Card**" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

४. अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व **Extra Seat No** विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे "**Extra Seat No Admit Card**" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

५. **Download** केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव/ जन्मतारीख अशा दुरूस्त्या असल्यास सदर दुरूस्त्या **Online** पध्दतीने करावयाच्या असून त्याकरीता **Application Correction** ही **Link** उपलब्ध करून देण्यात आलेली असून विहित दुरूस्ती शुल्क भरून दुरूस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात याव्यात व विभागीय मंडळाच्या मान्यतेनंतर "**Correction Admit Card** " या **Link** व्दारे सुधारीत **Admit Card** उपलब्ध होतील. विषय/माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात.

६. ज्या आवेदनपत्रांना "**Paid** " असे **Status** प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे **Status Update** होवून "**Late Paid Status Admit Card**" या **Option** व्दारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील.

७. फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.

८. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुनःश्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (**Duplicate**) असा शेरा देऊन विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

तरी फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(देविदास कुलाळ)<br>
सचिव,<br>
राज्य मंडळ, पुणे ४.

दिनांक : ०९/०१/२०२५